# सिंधुदुर्ग जिल्हा पोलीस दल

## सिंधुदुर्ग पोलीस दलातील कार्यरत कर्मचारी यांनी केलेल्या अत्युत्कृष्ठ कामगिरीबाबत

### १) <u>वैभववाडी पोलीस ठाणे- पोलीस शिपाई ६४७/ संदीप राठोड यांचे साहसी कृत्याबाबत.</u>

दि. ३१/०८/२०१९ रोजी पोकॉ/६४७ संदीप राठोड यांना करुळ चेकपोस्ट येथे डयुटी नेमण्यात आलेली होती. सकाळी ०७.०० वा.चे सुमारास करुळ घाटात सुमारे ७०० फुट खोल दरीमध्ये पुण्याहुन गोव्याकडे जात असलेला कंटेनर एच.आर.५५.एम.५९४९ हा करुळ घाट उतरत असताना एका धोकादायक वळणाच्या ठिकाणी संरक्षक कठडा तोडुन दरीत लटकलेल्या अवस्थेत आहे व कंटेनरचा चालक हा कॅबिनमध्ये अडकलेला असुन तो बचावासाठी आवाज देत आहे अशी माहीती करुळ चेकपोस्ट येथे कर्तव्यावर असलेल्या पे ाकॉ राठोड यांना एका वाहन चालकांनी दिली. त्यानंतर राठोड यं ानी याबाबत प्रभारी अधिकारी सपोनि श्री.बाकारे साहेब यांना सदर अपघाताची माहीती कळवली व त्यानंतर क्षणाचाही विलंब न करता घटनास्थळकाडे धाव घेतली. घटनास्थळी जावुन कंटेनर चालक हा अतिशय घाबरलेल्या अवस्थेमध्ये होता व तो कॅबिनमधुन “ मुझे बचाव नही तो मै खाई मे गीर जाऊंगा ” असे सांगुन मदतीची याचना करीत होता. त्यावेळी राठोड यांनी संबधीत चालकाला धीर देत वाचविण्यासाठी प्रयत्न सुरु केले.

त्यानंतर सदर ठिकाणी कोणतेही बचावासाठीचे साहीत्य उपलब्ध नसल्याने राठोड यानी घाटातुन जाणाऱ्या दोन ट्रक चालकांना थांबवुन मदतीची विनंती केली. सदर ट्रक चालकांकडे असलेल्या दोरीच्या सहाय्याने लाकडी फळयाची शिडी तयार केली व सदर शिडीची दोरी सुरक्षितरित्या एका टोकाला बांधुन एक टोक राठोड यांनी कंटेनर चालक उदयविरसिंह यांचेकडे फेकले. त्या दोरीला उदयविरसिंह यांनी घट्ट पकडल्यानंतर ते सुरक्षित बाहेर येतील याचा अंदाज घेत राठोड व मदतकर्त्यांनी कंटेनर चालकाला दरीच्या कठडयावर सुरक्षितरित्या बाहेर काढण्यात आले. उदयविरसिंह हे घडलेल्या अपघातामुळे प्रचंड मानसिक दडपणाखाली होते तसेच त्यं ाचे छातीला संरक्षक कठडयाची भिंत घासल्याने त्यं ाना किरकोळ दुखापत झाली होती म्हणुन राठोड यं ानी त्यांना तात्काळ उपचारासाठी वैभववाडी ग्रामिण रुग्णालयात दाखल केले.

पोलीस कॉन्स्टेबल संदीप राठोड हे पोलीस दलात नवखे असुनही त्यांनी करुळ घाटात बजावलेली सेवा ही वाख्याने जोगी आहे. सदर ठिकाणी त्यांनी आपला स्वताचा जीव धोक्यात घालुन चालकाला वाचविण्यामध्ये महत्वाचे योगदान दिलेले आहे. सदर बचावकार्यात आपला जीव गमावु शकतो याची त्यांना जाणीव असतानाही त्याची पर्वा न करता त्यांनी कर्तव्य पहीले मानत त्यांनी ही जोखीम खांदयावर घेतली व त्यात ते यशस्वी झाले.त्यांनी केलेल्या या शौर्याबद्दल सिंधुदुर्ग जिल्हयातील सर्व वर्तमानपत्रातुन तसेच सोशल मिडीयातुन त्यांचे कार्याचा गौरव करण्यात आला.याची दखल घेवुन मा.पोलीस अधीक्षक श्री.दिक्षीतकुमार गेडाम सर यांनी राठोड यांना तात्काळ जिल्हा मुख्यालयात बोलवुन त्यांचा गौरव केला व १०,०००/- रुपये बक्षिस दिले.


Hero
B.S.CHAHAR
Vivo V9
Dual Rear Camera
2019.08.31 13:43


BOMBAY PUNJAB GOODS CARRIER
Hero